क्र.उशिप/राज-अराज/२०१८/१२२/प्रशा – २/ ७३७
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन,
प्रशासकीय इमारत, मुंबई उपनगर जिल्हा,
८ वा मजला,शासकीय वसाहत,वांद्रे (पुर्व),
मुंबई - ४०००५१
दिनांक: ७८/०७/२०२१

**परिपत्रक**

**विषय:** उच्च शिक्षणास परवानगी तथा ना – हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.

उच्च शिक्षणास प्रवेश घेण्याकरीता अथवा अभ्यासक्रम पूर्ण करण्याकरीता संचालनालयाची परवानगी तथा ना – हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचे बरेचसे अर्ज संचालनालयास प्राप्त होतात. परंतू ब-याचदा अधिकारी / कर्मचारी यांचेकडून उच्च शिक्षणास प्रवेश घेतल्या नंतर अथवा सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस बसण्याकरीता अर्ज सादर केले जातात. तसेच अभ्यासक्रम कोणत्या विद्यापीठामार्फत अथवा संस्थेमार्फत पूर्ण करण्यात येणार आहे, अभ्यासक्रमास कोणत्या शैक्षणिक वर्षाकरीता प्रवेश घेण्यात येणार आहे, अभ्यासक्रमाचा कालावधी किती आहे, अभ्यासक्रम बहि:स्थ अथवा नियमित पद्धतीचा आहे किंवा कसे याबाबत सविस्तर माहिती तसेच अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीच्या संबंधीत विद्यापीठाच्या अटी व शर्ती याबाबतची इत्थंभूत माहिती अधिकारी / कर्मचारी यांचेकडून संचालनालयास प्राप्त होत नाही.

२. शासन सेवेत दाखल झाल्यानंतर शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना उच्च शिक्षणास प्रवेश घेण्यापूर्वी कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे तसेच अभ्यासक्रम कोणत्या विद्यापिठामार्फत घेण्यात येणार आहे, अभ्यासक्रमाचा कालावधी किती आहे, अभ्यासक्रम बहि:स्थ अथवा नियमित पद्धतीचा आहे किंवा कसे, तसेच अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीच्या संबंधीत विद्यापीठाच्या अटी व शर्ती याबाबतची माहिती कार्यालयास उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळे यापुढे सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी उच्च शिक्षणास प्रवेश घेण्यापूर्वी संचालनालयाच्या पूर्वपरवानगीसाठी अर्ज करताना या सोबत जोडलेल्या प्रपत्र - अ मधे दिलेल्या नमुन्यातील माहितीसह अर्ज करावा. परवानगी मागणारा अर्ज हा उच्च शिक्षणास प्रवेश घेण्यापूर्वी कार्यालय प्रमुखामार्फत संचालनालयास सादर करणे अपेक्षीत आहे. प्रवेश घेण्यापूर्वी परवानगी घेणे शक्य नसल्यास प्रवेश घेतल्यावर विनाविलंब परवानगी घेणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात नसलेले तसेच उच्च शिक्षणास प्रवेश घेतल्यानंतर विलंबाने अथवा सदर अभ्यासक्रमाच्या परीक्षेस बसण्याकरीता केलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३. सर्व कार्यालय / शाखा प्रमुखांनी सदर परिपत्रक आपल्या कार्यालय / शाखेतील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन द्यावे.

४. सदर परिपत्रक संचालनालयाच्या http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे.

(भू. वि. देशपांडे)
उपसंचालक (प्रशासन)
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

सहपत्रः वरील प्रमाणे

प्रत: माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. अर्थ व सांख्यिकी संचालनालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी
२. सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व)
(सहसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, प्रादेशिक कार्यालय (सर्व) यांनी सदर परिपत्रक आपल्या विभागातील इतर कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचा-यांच्या निदर्शनास आणुन द्यावे, ही विनंती.)
३. जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
४. जिल्हा सांख्यिकी अधिकारी, जिल्हा सांख्यिकी कार्यालय (सर्व)

प्रत:

१. अपर संचालक (सर्व)
२. सह संचालक (सर्व) [] अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
३. प्रशासन शाखा - १/२/३/४ [] मुख्य कार्यालय, मुंबई
४. सर्व शाखा प्रमुख

प्रपत्र अ

उच्च शिक्षणास प्रवेश घेण्यास परवानगी मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १ | अधिकारी / कर्मचा-याचे नावः- | |
| २ | धारण केलेले पदः- | |
| | वेतन श्रेणीः- | |
| ३ | भ्रमणध्वनी क्रमांकः- | |
| | ईमेल आय डीः- | |
| ४ | सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयाचे नावः- | |
| | पत्ताः- | |
| | दुरध्वनी क्रमांकः- | |
| ५ | परवानगी मागण्यात आलेल्या अभ्यासक्रमाबाबतचा तपशिलः- | |
| ५.१ | अभ्यासक्रमाचे नावः- | |
| ५.२ | विद्यापिठाचे नावः- | |
| ५.३ | अभ्यासक्रमाचा प्रकारः- (नियमित / बहिस्थ) | |
| ५.४ | अभ्यासक्रमाचा कालावधीः- | |
| ५.५ | परीक्षेचा अंदाजित दिनांकः- | |

अधिकारी / कर्मचा-याची सही

कार्यालय प्रमुखाचे अभिप्राय

कार्यालय प्रमुखाची सही

टिप -

१. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिपत्याखाली नसलेल्या कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी/कर्मचारी कार्यालय प्रमुखाच्या अभिप्रायाशिवाय मुख्य कार्यालयास थेट अर्ज करू शकतात.

२. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठीच्या संबंधीत विद्यापीठाच्या अटी व शर्ती अर्जासोबत सादर करण्यात याव्यात.